# ...तरच शहराकडे वाढणारा लोकांचा लोंढा रोखणे शक्य : बजाज

फलटण, दि. १३ : ग्रामीण भागातून शहराकडे सुरु असलेला ओढा, त्यातून झोपडपट्यांमध्ये होणारी वाढ आणि त्याद्वारे शहरातील नागरी सुविधांवर येणारा ताण रोखण्यासाठी खेडी सक्षम करुन तेथे स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आदी नागरी सुविधा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन बजाज ॲटोचे उपाध्यक्ष मधूर बजाज यांनी केले.

विविध संस्थांद्वारे येथील निंबकर ॲग्रीकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट (नारी) या संस्थेने उभारलेल्या बजाज सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या (बजाज शाश्वत विकास केंद्राच्या) नूतन इमारतीच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी किर्लोस्कर ब्रदर्सचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक संजय किर्लोस्कर, निंबकर सीड्सचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक झिया कुरेशी, कमिन्स जनरेटर टॅक्नॉलॉजिज इंडियाचे कार्यकारी संचालक प्रदीप भार्गव आदी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील जनतेला उच्च तंत्रज्ञानाच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आग्रही असलेल्या डॉ. अनिल राजवंशी यांना जमनालाल बजाज या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्यापासून म्हणजे सन २००१ पासून गेली दहा वर्षे आपण ओळखत आहे. डॉ.राजवंशी हे ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या जगातील शास्त्रज्ञांपैकी सर्वश्रेष्ठ तंत्रज्ञ असल्याचे नमूद करुन त्यांनी संशोधित केलेली सौरऊर्जेवर चालणारी सायकल रिक्षा हे पर्यावरणाचा ऱ्हास न होता चालणारे उत्तम वाहन असून त्यांची अन्य संशोधनेही ग्रामीण भागासाठी उपयुक्त असल्याचे मधुर बजाज यांनी स्पष्ट केले.




**मार्गदर्शन करताना मधुर बजाज, शेजारी व्यासपीठावर डॉ. नंदिनी निंबकर, डॉ. अनिल राजवंशी, संजय किर्लोस्कर, झिया कुरेशी, प्रदीप भार्गव.**

डॉ.राजवंशी हे तांत्रिक क्षेत्रातील संशोधनाबरोबरच उत्तम प्राध्यापक (लेक्चरर) असल्याचे नमूद करुन त्यांनी तरुणांना ग्रामीण भागाच्या विकासासाठी उद्युक्त केले आहे. त्याशिवाय ते उत्तम लेखकही आहेत. त्यांचे विविध लेख, वृत्तपत्रे आणि अन्य प्रसिध्दी माध्यमाद्वारे प्रसिध्द झाले असल्याचे बजाज यांनी निदर्शनास आणून दिले.

आपण दिल्ली येथील बिझनेस स्कूलच्या विद्यार्थ्यांशी इंटरनेटद्वारे संपर्क साधून त्यांना ग्रामीण भागाच्या विकासासाठी डॉ.राजवंशी यांनी केलेल्या प्रयत्नांची आणि संशोधनाची माहिती दिल्यानंतर हे विद्यार्थी वेबसाईटद्वारे डॉ. राजवंशी यांच्या संपर्कात आल्याने उत्साहित झाले आहेत. ग्रामीण विकासाच्या कल्पना तरुणांमध्ये रुजविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या डॉ. राजवंशी यांनी या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्यांचे करिअर सुरु होण्यापूर्वीच्या कालावधीत त्यांच्याशी पुन्हा संपर्क करण्याचे आवाहन करतो. त्यातून हे विद्यार्थी निश्चित दिशा प्राप्त करतील, असा विश्वास बजाज यांनी व्यक्त केला.

शहराकडे जाणारे मानवी लोंढे रोखण्यासाठी त्यांना ग्रामीण भागात उद्योग व्यवसायाच्या आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न किर्लोस्करवाडी येथील प्रकल्पाने केल्याची आठवण करुन देत ग्रामीण भागाला उद्योगाचा चेहरा देण्याचा तो प्रयत्न होता. अलीकडे ग्रामीण भागातही उद्योग क्षेत्र विस्तारत असताना त्याला बजाज शाश्वत विकास केंद्राची उभारणी निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास संजय किर्लोस्कर यांनी व्यक्त केला.

निंबकर कृषी संशोधन संस्थेच्या आवारात उभारण्यात आलेल्या बजाज शाश्वत विकास केंद्राच्या इमारतीचे उद्‌घाटन मधुर बजाज यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते इमारतीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचवेळी किर्लोस्कर ब्रदर्सनी देणगी दाखल दिलेल्या सौरऊर्जेवर चालणाऱ्या पंपाचे उद्‌घाटन संजय किर्लोस्कर यांच्या हस्ते झाले. नारीच्या अध्यक्षा डॉ. सौ. नंदिनी निंबकर यांनी स्वागत केल्यानंतर नारीचे संचालक डॉ. अनिल राजवंशी यांनी प्रास्ताविकात बजाज शाश्वत विकास केंद्राचे प्रयोजन विषद करताना या केंद्राचा उपयोग संशोधन व प्रशिक्षणासाठी केला जाणार असून विविध विषयातील तज्ज्ञांनी एकत्रित विचारविमर्श करुन ग्रामीण भारताच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशिष्ठ तंत्रज्ञान विकसित करण्यावर या केंद्राद्वारे भर दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी डॉ.राजवंशी यांनी या केंद्राच्या उभारणीसाठी विविध संस्था व व्यक्तींनी केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन इमारत व तेथील सोयीसुविधांविषयी सविस्तर विवेचन केले.

यावेळी कमिन्सचे प्रदीप भार्गव आणि संजय किर्लोस्कर यांचीही भाषणे झाली. डॉ. अनिल राजवंशी यांनी आभार मानले.

कार्यक्रमास कमिन्स इंडियाचे उपाध्यक्ष दिनेश कॅस्टेलिनो, किर्लोस्करचे संचालक जयंत सप्रे, आयआयटी मुंबईचे माजी संचालक व अणुऊर्जा नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. सुहास सुखात्मे, कृषीतज्ञ पद्‌मभूषण डॉ. बी.व्ही. निंबकर, उद्योजक नीरज चंद्रा, शमा पवार, श्रीमती मीना पवार, युनायटेड वेस्टर्न बॅंकेचे माजी अध्यक्ष डॉ. पी.एन. जोशी, शिक्षण तज्ञ डॉ. मॅक्सिन बर्नस्टन, डॉ.जे.टी. पोळ, डॉ. उदय देशपांडे उपस्थित होते.

स
र
ी रक्कम
रल्यास
हकाचे
रणीची
असून
२०११
इंधन
तर म
२०१२
त्याच्या
असून
वीज
अशी
यांनी
दिलासा
करू.
तरणने
भोसले
नाही.
कीमुळे
वारात
पुरवठा
रण व
लेल्या
असे
यांनी